**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२६/०९/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ०६ शुक्रवार दि.३०/०९/२०११ रोजी सकाळी ११.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- ३०/०९/२०११ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा दिनांक १/१०/२०११ पासून जास्तीत एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली मनपा कर्मचा-यांमार्फत करणे किंवा सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना उक्त कालावधी साठी मुदतवाढ देणे विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** विषय क्रमांक ४६ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६**

विषय क्रमांक-४६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११

ठराव क्रमांक- ४६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा दिनांक १/१०/२०११पासून जास्तीत एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली मनपा कर्मचा-यांमार्फत करणे किंवा सध्याचे जकात अभिकर्ता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना उक्त कालावधी साठी मुदतवाढ देणे विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका जकात विभाग दिनांक २६/९/२०११

विषय- दि.१-१०-२०११ ते जकात अभिकर्ता नियुक्ती होईपर्यंत. या कालावधीसाठी जकात व पारगमन शुल्क वसुली बाबत.

सविनय सादर,

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेने सन २०११-१२ या कालावधीकरीता जकात व पारगमन शुल्क वसुली करणेकामी जकात अभिकर्ता नियुक्ती बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.३६ दि.७/९/२०११अन्वये किमान देकार रक्कम रू.६०,९६,१५,०००/- व यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी/ नाटयगृह बांधणे / महापौर निवास बांधकाम या करीता रक्कम रू.२ कोटी निश्चित करून अहमदनगर महानगरपालिका हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेकामी सध्याचे ठेकेदाराचा कालावधी संपण्यापूर्वी कमीत कमी मुदतीची जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून शासन परिपत्रकानुसार निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे अशाबाबत ठराव पारीत करण्यात आलेला असल्याने अहमदनगर महानगरपालिकेने दि.८/९/२०११ते २६/९/२०११ या १९ दिवसांची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केली होती.

महानगरपालिकेने प्रसिध्दीस दिलेल्या उक्त निविदा प्रक्रियेबाबत सोवीनियर डेव्हलपर्स प्रा.लि. धुळे यांनी मा. शासनाकडेस दाखल केलेल्या तक्रारी चे अनुषंगाने मा. शासनाने पत्र क्र./ अमपा ०९११/ प्र.क्र.३२५ /नवि२४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि. २१ सप्टेंबर २०११ चे पत्रान्वये

सन २०११-१२ साठी अहमदनगर महानगरपालिकेमार्फत जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रकरणी मा.शासन परिपत्रक क्र.जकात २०११/ प्र.क्र.११/नवि-३४ दि.१९/४/२०११ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशाबाबत निर्देश महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत.

मा.शासनाचे दि.१९/४/२०११चे परिपत्रकातील मुद्दा क्र.२(III)नुसार निविदा प्रसिध्दी व निविदा स्विकृती च्या दिनांकामध्ये कमीत कमी एक महिन्याचा अवधी देण्यांत यावा अशाबाबत निर्देश देण्यांत आलेले आहेत. तथापी सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांची जकात ठेक्याची मुदत दि.३०/९/२०११ रोजी संपत असुन तत्पुर्वी उक्त निर्देशान्वये निविदा प्रक्रिया पुर्ण होउ्र शकत नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९अनुसुची "ड" प्रकरण ५मधील २(१)नुसार-कोणतीही संविदा करण्यापुर्वी निदान सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे नोटीस देउ्न निविदा मागविण्यात आल्या पाहीजेत अशाबाबत तरतुद असल्याने अहमदनगर महानगरपालिकेने सन २०११-१२करीता जकात अभिकर्ता नेमणुक प्रक्रियेसाठी विक्री व निविदा तयार करणे याकरीता १९ दिवसांचे अवधीची जाहीर निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात आलेली होती.

मा.शासनाच्या दि.२१/९/२०११ च्या निर्देशान्वये व परिपत्रक क्र. जकात /२०११/ प्र.क्र.११ / नवि-३४ दि.१९/४/२०११चे प्राप्त निर्देशान्वये अहमदनगर महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेमध्ये फेरबदल करून निविदा प्रसिध्दी व निविदा स्विकृतीमध्ये दि.८/९/२०११ ते दि.७/१०/२०११ अखेर ३० दिवसांचा कालावधी देउ्न निविदा सुचनेत बदल करून उक्त बदलाबाबत दि.२१/९/२०११ रोजी त्यानुसार शुध्दीपत्र प्रसिध्दीस दिलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने शुध्दीपत्रात प्रसिध्द केल्यानुसार सन २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमणेकामी ची निविदा प्रक्रिया ही दि.७/१०/२०११ पर्यंत चालु राहाणार असुन सध्याचे जकात अभिकर्ता यांचे जकात ठेक्याची मुदत दि.३०/९/२०११ रोजी रात्री १२ वा. संपते आहे. सबब सन २०११-१२ करिता चे निविदा प्रक्रियेमध्ये नविन अभिकर्ता नेमणुक होईपर्यंत म्हणजे दि. १/१०/२०११ पासुन पुढील कालावधीसाठी जकात व पारगमन शुल्कची वसुली

महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत करावी अथवा सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.यांना उक्त कालावधी पुरती मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणे अत्यावश्यक आहे. महानगरपालिकेकडील नाका कर्मचारी सध्या इतर विभागांत वापरण्यांत येउन्न नागरिकांना सुविधा देणे, घरपट्टी वसुली इतर सोयीस्कर कामे त्यांना देउन्न त्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यांत येत आहेत. महानगरपालिकेमार्फत जकात कराची वसुली करावयाची झाल्यास जकात नाक्यासाठी लागणारे महानगरपालिकेचे कर्मचारी सुमारे १८० ते २००लागणार आहेत.आस्थापना विभागाच्या अहवालानुसार १७७कर्मचारी यांना तहसिल कार्यालयाकडे निवडणुकीच्या कामासाठी (अतिरिक्त काम) व ३३ कर्मचारी जनगणना विभागाकडे देण्यांत आलेले आहे. त्यामुळे जकात व पारगमन शुल्क वसुली कामी अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी नेमणे कठीण आहे. तसेच कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे महानगरपालिकेच्या इतर कामांवर परिणाम होवु शकातो.

तसेच महानगरपालिकेस मध्यवर्ती गोडावुन करीता वाडीया पार्क स्टेडीयममध्ये जागेची सोय नसल्याने सध्या अभिकर्त्याने भाडेतत्वावर घेतलेली ठिकाण-यश पॅलेस हॉटेल समोर, नगर-पुणे रोड,अ.नगर येथील खुली जागा ही मध्यवर्ती गोडावुन करीता घ्यावी लागेल व सदर कामी दरमहा सुमारे रू.१.२० लक्ष ते रू.१.५० लक्ष इतका खर्च येणार आहे. तसेच सद्या जकात अभिकर्ता हे महानगरपालिकेच्या मुख्य ४ जकात नाक्यांवर व मध्यवर्ती गोडावुन येथे वापरात असलेले संगणक, दुरध्वनी,वाहने व इतर तद्नुषंगिक बाबींसाठी ही मोठा खर्च येणार असुन जकात नाके व महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे संरक्षण या करीता वेगळी तरतुद करावी लागेल.

महानगरपालिकेने २०१०-११ मध्ये जकात अभिकर्त्याशी जकातीचा करारनामा करताना मा. शासनाच्या निर्देशान्वये अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ बाबत खालील प्रमाणे करारमान्यात अटीचा समावेश केलेला आहे.

Due to election code of conduct, it may not have been possible for the Municipal Corporation to announce the revised Octroi-rates for the year 2010-11 if for this reason or any other reason, the Municipal Corporation feel that they may not be able to finalise all the formalities for appointment of octroi agent before

contract ending date so fixed, the Municipal Corporation in their discretion may complete the formalities within specific period after this date and tender agency for next year. They may, for this purpose only, further in their/discretion extend the period of contract of the existing agency by specific period., if he is agreeing or themselves under take Octroi collection through their own staff for specific period. It is not compulsory that for this purpose, the period of existing contract should be extended and the agent also cannot have any right of extension. If the Municipal Corporation chooses, in its discretion to itself undertake octroi collection during the period.

तसेच मा.शासनाने दि.१९/४/२०११ रोजी दिलेल्या परिपत्रकातील मुद्दा क्र.४ (I) नुसार- करारनाम्याचा कालावधी हा कोणत्याही परिस्थित एक वर्षा पेक्षा जास्त असु नये , अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये उदा. निवडणुकीची आचार संहिता, नैसर्गीक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे हा कालावधी वाढविण्याची गरज भासल्यास व संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी वाढ सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने अनुज्ञेय राहील. अशाबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच दि.०१/१०/२०११ ते जकात अभिकर्ता नियुक्त होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त १ महिना यात जो कमी कालावधी असेल या कालावधी करीता जकात अभिकर्त्यास मुदतवाढ द्यावयाची झाल्यास सध्याचे जकात अभिकर्ता यांचे जकात ठेक्यास महानगरपालिकेने मागील वर्षात निश्चित केलेली देकार रक्कम रू.५४.५५कोटी याचा साप्ताहीक हप्ता रक्कम रू. १,०९,१०,०००/- यामध्ये मा.शासनाचे निर्द्वेशानुसार १५टक्के वाढ करून त्यानुसार येणारी साप्ताहीक हप्त्याची रक्कम रू.१,२५,४६,५००/- साप्ताहीक हप्ता रक्कम निश्चित करून व त्यास संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी मुदतवाढ देता येईल अशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची ड मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मागील अटी व शर्तीस अधीन राहुन मुदतवाढ देता येईल. **/अ**

तरी सन २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमणुक होईपर्यंत म्हणजे दि. ०१/१०/२०११ पासून जकात व पारगमन शुल्क वसुली महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत करावी अथवा सध्याचे जकात अभिकर्ता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना उक्त कालावधीसाठी मुदतवाढ द्यावी याबाबत निर्णयास्तव सक्षम प्राधिकरण म्हणून मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे. दि.२६/९/२०११

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- जकात व पारगमन शुल्क वसुली मनपा कर्मचा-यांमार्फत करावी अथवा सध्याचे जकात अभिकर्ता यांच्याकडून प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे करावी या निर्णयास्तव सदरील प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.२६/९/२०११

मा.आयुक्त साहेब :- मा. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ आजच पाठवा. दि.२६/९/२०११

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा दिनांक १/१०/२०११ पासून जास्तीत एक महिन्याकरिता जकात व पारगमन शुल्क वसुली मनपा कर्मचा-यांमार्फत करणे किंवा सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना उक्त कालावधी साठी मुदतवाढ देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

मा.उपायुक्त (सा) श्री. डोईफोडे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- कमीत कमी एक महिना कालावधीसाठी व जास्तीत जास्त किती कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल.

मा.श्री. सप्रे द.ना. :- एक वर्षाच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे विषयी उल्लेख आहे.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- मा. शासनचे दिनांक १९/४/२०११ च्या परिपत्रकानुसार करारनाम्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती- करारनाम्याचा कालावधी हा कोणत्याही परिस्थितीत एक वर्षा पेक्षा जास्त असू नये. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये उदा. निवडणूकीची आचारसंहिता, नैसर्गिक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे हा कालावधी वाढविण्याची गरज भासल्यास व संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी वाढ सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने अनुज्ञेय राहील. अशा बाबत निर्देश दिलेले आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- जकात वसुली मनपा मार्फत केल्यास आपले कर्मचारी उपलब्ध नाहीत जागा नाही. अशा अडचणी जकात वसुली म.न.पा. कर्मचा-यांमार्फत केली तर त्या त्वरीत सोडविणार का ? म.न.पा. कर्मचारी एवढी जकात वसुली करतील का ? वसुली न झाल्यास जबाबदारी कुणाची.

मा.उपायुक्त (सा) श्री. डोईफोडे साहेब :- महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत जकात वसुली करणेसाठी आढळलेल्या अडचणी सभेपुढे मांडलेल्या आहेत.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- सदर ठेकेदार तयार आहे का ?

मा.श्री. डागवाले कि.आ :- आम्ही निर्णय घेतला आणि ठेकेदार त्यास तयार झाला नाही तर

मा.उपायुक्त(सा.)श्री.डोईफोडे साहेब :-मा.सभेने निर्णय घ्यावा तद्‌नंतर पुढिल कार्यवाही करणेत येईल.

मा.सौ. गायकवाड नि. व. :- सध्याचे जकात अभिकर्त्यास ऑफिस रिपोर्टानुसार जकात वसुली करणेस मुदतवाढ देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्टानुसार एक महिन्यासाठी मुदतवाढ देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सध्याचे जकात अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना सन २०११-२०१२ करिता जकात व पारगमन शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणूक होईपर्यत म्हणजे दिनांक ०१/१०/२०११ पासून एक महिन्याचे कालावधीसाठी जकात वसुली कामी ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मुदतवाढ देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली करणे कामीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत म्हणजे दिनांक १/१०/२०११पासून एक महिन्याचे कालावधी करिता जकात व पारगमन शुल्क वसुली कामी मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मागील वर्षात निश्चित केलेली देकार रक्कम रूपये ५४.५५ कोटी याचा साप्ताहीक हप्ता रक्कम रूपये १,०९,१०,०००/- यामध्ये मा. शासनाचे निर्देशानुसार १५% वाढ करून त्यानुसार येणारी साप्ताहीक हप्त्याची रक्कम रूपये १,२५,४६,५००/-(रूपये एक कोटी पंचवीस लाख सेहेचाळीस हजार पांचशे फक्त) साप्ताहीक हप्ता निश्चित करून मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.